(923)

नकलेचा अर्ज मिळालेचा दिनांक 10-05-18
नकलेचे पैसे मिळालेचा दिनांक 18-05-18
नक्कल तयार कलेचा दिनांक
नक्कल दिल्याचा दिनांक 06-06-18

282/18
10/5/18

परिशिष्ट ''ब''

''विश्वभुषण फाऊंडेशन '' निमगांवजाळी

अ अता.संगमनेर जि.अहमदनगर

या संस्थेचे

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहमदनगर विभाग, अहमदनगर

<u>ज्ञापन</u>

१. सार्वजनिक न्यासाचे नांव- विश्वभुषण.फांऊडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर

२. सार्वजनिक न्यासाचे कार्यालयाचा पत्ता- द्वारा-श्री सचिन शंकर भोसले रा.हॉटेल तंरग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग ,मु.पो निमगांव जाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर सदर कार्यालय विश्वस्त मंडळाच्या बहुमताने अन्य ठिकाणी बदलण्यात येईल.

३. <u>न्यायासाचे उद्येश खालील प्रमाणे राहतील-</u>

१. सदर संस्था मुख्यत्वे करुन निमगांव जाळी परिसरातील समजाचा सामाजिक,सांस्कृतिक,धर्मदाय,शैक्षणिक,शारीरिक इत्यादी सर्वागिण विकासासाठी स्थापन करण्यात आली आहे.

२. समाजाच्या विशिष्ट सांस्कृतिक कुळाचार,चालीरिती,राहणी,इतिहास पंरपरा आणि व्यक्ती व समाज या संबधीताचा परस्पर परिचय घडवुन आपणेस मदत करणे ,गावामध्ये पाणी,रस्ता,गटार ,सांडपाणी व दवाखाना व स्वच्छता अशा मुलभुत सोयी निर्माण करणे व गावाच्या सार्वागीण विकास होण्यासाठी प्रयत्न करणे.

३. परिसरातील समाजातील दुर्बल घटकासाठी उन्नतीसाठी प्रयत्न करणे,समाजातील,कुटुंबातील अनाथ,निराधार,निराश्रीत,रूग्ण,आपदग्रस्त व वृध्द व्यक्तीस सर्वतोपरी सहाय करणे ,मदत करणे.

४. परिसरातील समाजामध्ये परस्पर ऐक्य ,प्रेमभाव,स्नेह भाव वाढविणे,शिस्त,हुरहुडी,कर्तव्य निष्ठा,स्वाभिमान निर्माण करून तो चालविणे,समाजातील व्यक्तीच्या सहभागी होणे ,सर्वतोपरी मदत करणे.

५. समजातील सर्व व्यक्तीचे हित जोपासणे ,त्याना त्यांच्या न्याय हक्काची कर्तव्याची जाणीव करुन देणे,शासकीय सोयींसुविधा मिळवुन देणे,जरूर पडल्यास त्याच्या न्यायहक्कासाठी सहाय करणे.

६. राष्ट्रीय, एकात्मतेसाठी सर्व सण/उत्सव,राष्ट्रीय सण,राष्ट्रभक्ताच्या जंयती,पुण्यतीथी साजरी करणे,समाजातील दिवगंत व्यक्तीची जंयती/पुण्यतीथी साजरी करणे

True copy

विश्वभुषण फाऊंडेशन
निमगांवजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

७. निरनिराळया ठिकाणी जाऊन राष्ट्रीय एकत्मतेचा प्रचार व प्रसार करणे,तेथे मेळावे,परिषदा,अधिवेशने,सभासंमलेने भरविणे व आयोजित करणे त्यायोगे समजाला योग्य मार्गदर्शन करणे.

८. प्राथमिक आरोग्य चालविणे,रक्तदान ,नेत्रदान,कुटुंबकल्याण आरोग्यशिबीराचे आयोजन करणे.

९. समजातील सुशिक्षीत व्यक्तीना निरनिराळया शासकीय /निमशासकीय,ग्रामदयोग प्रणीत नेहरू युवा केद्रमार्फत राबविल्या जाणा-या योजनाची माहिती मिळवुन देणे ,मार्गदर्शन करणे.

१०. नैसगिक आपदग्रस्त,भुंकप पिडीत अपघात ग्रस्त,अनाथ अपंग दिनदुबळया लोकांना संस्थेमार्फत सर्वतोपरी मदत करणे,वैदयकीय सेवा पुरविणे त्याच्या ~~स्वावलंबनासाठी- झटणे~~,रूग्णवहिकेची व्यवस्था पाहणे.

११. सामाजिक शैक्षणिक उन्नतीसाठी व शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणेसाठी बालवाडी,अंगणवाडी,प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक विदयलये,महाविदयालेय स्थापर करून चालविणे,औदयोगिक व तांत्रिक विदयालय चालविणे,अशिक्षीत महिला व पुरूषामध्ये साक्षरता मोहिम चालविणे,रात्रशाळा चालविणे.

१२. अनाथ आणि निराधार मुलामुलीसाठी व महिला विविध उपक्रम हाती घेणे ,वृध्दासाठी वृध्दाश्रम उभारणे व चालविणे तसेच अपंगासाठी शाळा चालविणे व त्यांना कृत्रिम अवयव व अन्य सोयी सुविद्या पुरविणे.

१३. परिसरातील गरीब व हुशार विदयार्थ्याना मोफत वहया पुस्तके,गणवेश वाटप करणे,शिष्यवृत्या देणे.

१४. अनुजाती/अनुजमाती/विमुक्त जमाती/भटकी जमात/विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागासवर्गीय इ मागासवर्गीयासाठी शाळा व आश्रमशाळा वसतीगृह चालविणे ,समजामंदिर बांधणे तसेच घटाकासाठी समाजपयोगी कार्य करणे,ग्रामस्वच्छता अभियान राबविणे..

३.<u>न्यासाच्या उत्पन्नाची साधने-</u>

देणगी , वर्गणी , ~~कॅरीटी शो, स्मरणीका प्रकाशन~~, सांस्कृतीक कार्यक्रम इत्यादी.

४. **विश्वभुषण फाऊंडेशन निमगांव जाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची एकुण संख्या कमीत कमी सात व जास्तीत जास्त अकरा राहील .अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभसदांची पुर्ण नांवे पत्ते, हुद्दे, धंदा व्यवसाय, राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे.

अध्यक्ष
विश्वभुषण फाउंडेशन
निमगावजाळी, ता. संगमनेर जि. अ.

| अ.न. | नाव | पत्ता | हुद्दा | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सचिन शंकर भोसले | मु.पो.निमगांवजाळी,हॉटेल तरंग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग,ता.संगमनेर जि.अहमदनगर | अध्यक्ष | ४० | भारतीय | समाजकार्य/ नोकरी |
| २ | श्री.शंकर सावळेराम भोसले | मु.पो.निमगांवजाळी,हॉटेल तरंग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग,ता.संगमनेर जि.अहमदनगर | उपाध्यक्ष | ६५ | भारतीय | समाजकार्य |
| ३ | सौ. विजया सचिन भोसले | मु.पो.निमगांवजाळी,हॉटेल तरंग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग,ता.संगमनेर जि.अहमदनगर | सचिव | ३८ | भारतीय | नोकरी |
| ४ | सौ. अनुराधा सुरेश मन्तोडे | मु.पो.मालेवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर | कार्याध्यक्ष | ३२ | भारतीय | समाजकार्य |
| ५ | महेश शंकर भोसले | मु.पो.निमगांवजाळी,हॉटेल तरंग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग,ता.संगमनेर जि.अहमदनगर | सहसचिव | ३५ | भारतीय | शेती |
| ६ | सौ.लता शंकर भोसले | मु.पो.निमगांवजाळी,हॉटेल तरंग जवळ,कोल्हार-घोटी राज्यमहामार्ग,ता.संगमनेर जि.अहमदनगर | खनिजदार | ६० | भारतीय | शेती |
| ७ | सौ.वैशाली भिमराज कदम | रा.साईभक्ती मेडिकल,साकुर मांडवे ता.संगमनेर जि.अहमदनगर | सह खनिजदार | ३६ | भारतीय | व्यवसाय |

अध्यक्ष
विश्वभुषण फाउंडेशन
निमगावजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

अध्यक्ष
(सचिन शंकर भोसले)

सह आयुक्त * धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग

## दाखला

असे प्रमाणीत करण्यात येते की, **"विश्वभुषण फाऊंडेशन " निमगांव जाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर** या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.नंबर | सभासदांचे नांव | पद | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री.सचिन शंकर भोसले | अध्यक्ष | [signature] |
| २. | श्री.शंकर सावळेराम भोसले | उपाध्यक्ष | [signature] |
| ३ | सौ विजया सचिन भोसले | सचिव | [signature] |
| ४. | सौ अनुराधा सुरेश मनतोडे | कार्याध्यक्ष | A.S.Muntode |
| ५. | श्री महेश शंकर भोसले | सहसचिव | M.S. Bhosale |
| ६. | सौ.लता शंकर भोसले | खजिनदार | सौ.ल.शं.भोसले |
| ७. | सौ.वैशाली भिमराज कदम | सहखजिनदार | V.Kadam |

स्थळ-निमगांवजाळी

तारीख /०४/२०१८

[signature]

अर्जदार

(सचिन शंकर भोसले)

सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझ्या समक्ष सह्या केल्या.

वकील | विशेष सरकारी वकील

लता ...री वाघ
...एल.बी
०-अॅडव्होकेट-०

[signature] अध्यक्ष

[signature] उपाध्यक्ष

[signature] साक्षी

True copy

[signature]

अध्यक्ष
विश्वभुषण फाऊंडेशन
निमगावजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

282/18
10/5/18
26/06/18

परिशिष्ठ "क"

"विश्वभुषण फाऊंडेशन " निमगांवजाळी

ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेची . . .

<u>नियम आणि नियमावली</u>

१.<u>नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या-</u>

अध्यक्ष-म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे अध्यक्ष असे समजले जाईल.

उपाध्यक्ष-म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे उपाध्यक्ष असे समजले जाईल.

सचिव- म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे सचिव असे समजले जाईल.

खजिनदार-म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे खजिनदार असे समजले जाईल.

कार्यकारी मंडळाचा सभासद म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांव जाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे कार्यकारी मंडळाचा सभासद असे समजले जाईल.

सभासद-म्हणजे विश्वभुषण फाऊंडेशन,निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेचे सभासद असे समजले जाईल.

४.<u>कार्यक्षेत्र-</u>

या संस्थेचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्र राज्यभर राहील.

५.<u>विश्वस्त बदलण्याची रित-</u>

या सार्वजनिक विश्वस्त निधीप्रमाणे नेमलेले सात विश्वस्त तहयात राहतील.मृत्यु, राजीनामा व अन्य कारणाने विश्वस्त पदांची जागा रिक्त झाल्यास राहीलेले विश्वस्त साध्या बहुमताधिक्याने सदर जागा स्विकृत करतील. तहयात नेमलेले विश्वस्त उर्वरीत विश्वस्तांची कमीतकमी एक व जास्तीत जास्त पाच वर्षाकरीता सहमतीने नेमणुक करतील.विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी पाच वर्षानी आपआपसामध्ये बहुमताने बदलण्यात येतील.

६.<u>हिशोबाचे वर्ष-</u>

न्यासाचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

७.<u>विश्वस्तांच्या सभा-</u>

न्यासाच्या विश्वस्तांच्या सभा तीन महिण्यातुन एकदा घेण्यात येईल परंतु आवश्यकता भासल्यास जादा सभा बोलविण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.त्याचप्रमाणे एकुण विश्वस्तांच्या २/३विश्वस्त हजर झाल्यास सभेची गणसंख्या पुर्ण होईल.गणसंख्ये अभावी तहकुब झालेली सभा

True Copy
अध्यक्ष
विश्वभुषण फाऊंडेशन
निमगांवजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल परंतु अशा सभेस फक्त विषय पत्रिकेतील विषयावरच चर्चा करण्यात येऊ शकेल.अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

८.सभेचे परिपत्र-

न्यासाच्या सभेचे परिपत्रक अध्यक्षांच्या सहीने पाठविले जाईल हे सभेपुर्वी किमान ३ दिवस अगोदर पोष्टाने अगर समक्ष देण्यात येईल.

९.विश्वस्त मंडळाची कामे व अधिकार-

या न्यासाच्या व्यवस्थापनेवर विश्वस्त मंडळ नियंत्रयण ठेवील.न्यासाच्या ध्येय धोरणाप्रमाणे काम पाहिल.न्यासाच्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी देणग्या जमा करणे, कर्ज उभारणे, वेगवेगळे उपक्रम राबविणे, ध्येयपुर्तीसाठी वेगवेगळया सेवक वर्गाची नेमणुक करणे त्यांच्या सेवेच्या शर्ती व इतर भत्ते ठरविणे व त्यांना सेवतुन कमी करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

१०.पदाधिका-यांची कामे-

अध्यक्ष-

सर्व विश्वस्त मंडळाच्या सभेच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष राहतील.कोणत्याही सभेत समसमान मते झाल्यास एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार अध्यक्षास राहील.संस्थेचे बँक खाते, पोस्ट खाते इत्यादी व्यवहारावर सहया करण्याचा अधिकार अध्यक्ष व सचिव यांना राहील.अध्यक्षांची ट्रस्टच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख राहील.

उपाध्याक्ष-

अध्यक्षाच्या गैरहजेरीत अध्यक्षांचे काम पाहणे.

सचिव-

विश्वस्त मंडळाने केलेल्या ठरावांची अमंलबजावणी करणेसाठी प्रयत्नशिल राहणे, अध्यक्षांच्या संमततीने विश्वस्त सभेच्या सभेचे परिपत्रक काढणे, सभेचे हिशेब व प्रोसिडींग लिहीणे अथवा लिहुन घेण संस्थेच्या वतीने शासकीय व निमशासकीय कार्यालयात हजर राहणे.त्याचप्रमाणे संस्थेच्या वतीने कोर्टात संस्थेचा प्रतिनिधी म्हणुन हजर राहणे व योग्य ती माहिती संबधीत वकीलांस कार्यालयास पुरविणे.संस्थेच्या वतीने पत्रव्यवहार करणे, बँक व्यवहार व पोष्टाचे व्यवहार यांच्यावर सहया करणे, विश्वस्त मंडळ व नोकर वर्ग या मधील दुवा म्हणुन समन्वय ठेवणे.

खजिनदार-

संस्थेच्या दैनंदिन व वार्षीक व्यवहाराचे जमाखर्चाचे कागदपत्र ठेवणे, सभासदांची वर्गणी , व्याज, कर्ज, देणे इतयादी रक्कम जमा करुन संर्वाची मान्य बिले अध्यक्षांच्या विश्वस्त मंडळाच्या परवानगीने चुकती करणे, मासिक व वार्षीक अंदाजपत्रक तयार करुन कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, हिशोबाच्या संबधी चोपडया, पावती बुके, चेक्स व पासबुके यांची जबाबदारी खजिनदारावर

अध्यक्ष
विश्वभुषण ...
...वजाळी, ता. संगमनेर ... अ.नगर

राहील.न्यासाच्या ठरविलेल्या बँकेमध्ये जमा होणारी रक्कम जमा करणे व त्या अनुषंगाने येणारी कामे करणे, खजिनदारास देनंदिन खर्चासाठी रुपये ५००/-शिल्लक ठेवता येतील.

**सभासदत्व व त्यांची नोंदणी पध्दती-**

२१ वर्षावरील कोणतेही भारतीय नागरिकांना संस्थेचे सभासद होता येईल.त्याकरीता त्याला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागले.आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतर सभासदाची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्यानंतर त्यांची नोंदणी सभासद यांदी मध्ये करण्यात येईल.एखादया अर्जदाराचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांस योग्य ते कारण दिले जाईल

सभासदाचे प्रकार-

१)**अजीव सभासद-** संस्थेला रक्कम रूपये २५०/- फक्त सभासद वर्गणी देण्या-या व्यक्तीला अजीव सभासद म्हणुन समजण्यात येईल

२)**साधारण सभासद**-संस्थेला सभासद रक्कम रूपये १२०/- वर्षिक (सभासद) जमा करण्या-या व्यक्तीला साधारण सभासद म्हणुन समजण्यात येईल

**सभासदत्व रद्द होणे-**

कोणताही कायदेशिर गुन्हा ठरला असेल,सभासद वर्गणी दिली नसेल,मरण पावला असेल, देश सोडुन परदेशात गेला असेल,व्यसनी झालेला असेल किंवा गैरवर्तुनक किवा संस्थेला नुकसान पोहचवित असल्यास असे निदर्शनांस असल्यास किंवा अन्य कारणा मुळे कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजुर करुन टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजण्यात येईल.

११.<u>न्यासाची गुंतवणुक-</u>

न्यासाच्या खजिनदारास किंवा अध्यक्षांना रुपये ५००/-पर्यत रोख रक्कम हातावर ठेवता येईल.जादा रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेत, शेडयुल्ड बँकेत, पोस्टात किंवा ट्रस्ट कायदयाच्या कलम ३५ अन्वये मान्यता प्राप्त सहकारी बँकेत गुंतवितायेईल.पैसे देण्याचा अगर काढण्याचा अधिकार अध्यक्ष व सचिव अथवा खजिनदार या पैकी कोणाही दोन पदाधिका-याच्या संयुक्त सहीने करण्यात येईल.

१२.<u>न्यासासाठी कर्ज-</u>

संस्थेला दैनंदिन खर्च भागविण्यासाठी काही वेळा अनामत रक्कम जमा करता येईल.परंतु त्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० च्या कलम ३६अ ३अन्वये मा.धर्मादाय आयुक्त पुणे यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३.<u>बँक खाते-</u>

संस्थेच्या ट्रस्टचे खाते [illegible] खजिनदार यापैकी कोणतेही दोन पदाधिकारी संयुक्त सहीने चालवतील.

True copy
[illegible]

अध्यक्ष
विश्वभुषण फाऊंडेशन
निमगावजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

१४.विश्वस्त निधिपत्रामध्ये बदल करण्याचा अधिकार-

या विश्वस्त निधीपत्रामध्ये कालमानानुसार योग्य तो बदल करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.या सार्वजनिक विश्वस्त निधीपत्रातील कोणतेही कलमे कमी करण्याचा अथवा त्यामध्ये वाढ करण्याचा विश्वस्त मंडळास अधिकार आहे.

१५.न्यासाचे हिशोब-

न्यासाचे हिशोब ठेवण्यासाठी रोज किर्द, खतावणी, जमापावती पुस्तकांचे रजिस्टर व इतर रेकॉर्ड नियमीत ठेवले जाईल.व प्रतिवर्षी ऑडीट रिपोर्टची कॉपी मा.सहाय्यक धर्मदाय आयुक्त , अहमदनगर विभाग, अहमदनगर यांना पाठविण्यात येईल.

१६.नविन विश्वस्तांच्या मिळकतीवरील अधिकार-

ज्या ज्या वेळी नविन विश्वस्त नेमले जातील त्या त्यावेळी हल्लीच्या विश्वस्तांना मिळकतीवरील विश्वस्त म्हणुन असलेले सर्व हक्क व अधिकार त्यांचेकडे वैयक्तीक व सामुहीकपणे सुपुर्द होतील ज्यायोगे त्यांना सनदशिर आणि वैद्य अधिकार प्राप्त होतील.

१७.आयकर अधिनियमाप्रमाणे व्यवस्था-

आयकर अधिनियमाप्रमाणे नोंदणीकृत न्यासाची नोंदणी करणे आवश्यक असल्याने आयकर अधिनियम १९६१चे कलम १२अ प्रमाणे न्यासाची नोंदणी करण्यात येईल आणि विश्वस्त व्यवस्थेचे उद्येशाप्रमाणे उत्पन्नावर सुट मिळविण्यासाठी मे इन्कम टॅक्स कमीशनर यांचेकडे नोदंणी करुन घेऊन कलम ३५ व कलम ८० जी प्रमाणपत्र मिळवण्यात येईल व त्या खात्याने इरवुन दिलेल्या नियमाप्रमाणे हिशेब पत्रके नियमीतपणे पाठविण्यात येईल.

१८.नोकरवर्ग-

विश्वस्तांना कारभारांच्या सुविधेसाठी व सुव्यवस्थेसाठी व्यवस्थापक, हिशेबनीस, कारकुन, पहारेकरी इत्यादी किंवा आवश्यक तो सेवक वर्ग नेमता येईल.अशा नोकरांचा पगार, रोजंदारी, बिदागी भत्ते इत्यादी ठरविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील त्याचप्रमाणे त्यांच्या सेवेच्या शर्ती व इतर नियम करण्याचा त्याचप्रमाणे त्यांना सेवेतुन मुक्त करण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार विश्वस्तांना राहील.

१९.न्यासांचे एकत्रिकरण अथवा बरखास्त करण्याबाबत-

जर न्यास काही कारणामुळे चालविणे शक्य नसल्यास याच प्रकारच्या उद्येश असणा-या पंजीकृत न्यासामध्ये एकत्रीत केला जाईल किंवा न्यासाची सर्व देणी दिल्यानंतर राहीलेली रक्कम पंजीकृत न्यासाकडे वर्ग करण्यात येईल व सदर ट्रस्ट बरखास्त करुन तसे मा.सहाय्यक धर्मदाय आयुक्त अहमदनगर यांना कळविण्यात येईल.

हे विश्वस्त निधीपत्र आज दिनांक /०४/२०१८ रोजी स्वखुशीने करुन ठेवले आणि या दिवसापासुन या व्यवस्थेची रुपये ५००/- पाचशे मिळालेली देणगी न्यासाची मिळकत म्हणुन

True copy
Attested

अध्यक्ष
विश्वभुषण फाउंडेशन
गावजाळी, ता. संगमनेर जि. अहमदनगर

समजण्यात येईल.त्यामध्ये वैयक्तीक हक्क राहीलेला नाही.सदर निधीपत्र मी माझे स्वखुशीने व राजीखुशीने विचारांती करून आजरोजी लिहुन ठेवले असे.

स्थळ-निमगांवजाळी

तारीख /०४/२०१८

सचिन शंकर भोसले

विश्वस्त निधीपत्र लिहुन ठेवणार

साक्षीदार

| अ.नंबर | पुर्ण नांव | पत्ता | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री.सचिन शंकर भोसले | रा.मु.निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अ.नगर | |
| २. | श्री शंकर सावळेराम भोसले | रा.मु.निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अ.नगर | |
| ३. | सौ विजया सचिन भोसले | रा.मु.निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अ.नगर | |
| ४. | सौ अनुराधा सुरेश मनतोडे | रा.माळेवाडी ता.संगमनेर जि अहमदनगर | A.S. Muntode |
| ५. | श्री महेश शंकर भोसले | रा.मु.निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अ.नगर | | 
| ६. | सौ लता शंकर भोसले | रा.मु.निमगांवजाळी ता.संगमनेर जि.अ.नगर | |
| ७. | सौ वैशाली भिमराज कदम | रा.साईभक्ती मेडिकल ,साकुर मांडवे ता.संगमनेर जि.अहमदनगर | VBkadam |

सर्व इसमांना मी ओळखतो त्यांनी माझ्या समक्ष सह्या केलेल्या आहेत

अध्यक्ष
विश्वभुषण फाऊंडेशन
निमगांवजाळी, ता. संगमनेर, जि. अ.नगर

दि. /४/१८
स्थळ - संगमनेर

ॲडव्होकेट
नोटरी | विलास कार्यवाही

(13)

## दाखला

वरून असे प्रमाणीत करतो की, आमची उत्तम माहिती,समजुतीप्रमाणे मिळकत नंबर सिटी सव्हे नंबर ५४३,मालमत्ता १९४६ असुन आर.आर.सी बांधकाम २५.२२ चौ फुट ही सचिन शंकर भोसले रा.निमगांव जाळी ता.संगमनेर जि अहमदनगर यांची असुन आम्ही विश्वभुषण फांऊडेशन या नावाने सदर जागेत स्थापन करीत असुन या नावाची अगर साम्य असलेली कोणतीही संस्था आमच्या परिसरात अगर भागात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदविण्यात आलेली नाही.

तारीख /०४/२०१८

स्थळ- निमगांव जाळी

श्री सचिन शंकर भोसले

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |
| सचिन शंकर भोसले | शंकर सावळेराम भोसले | विजया सचिन भोसले |

True copy

अध्यक्ष
विश्वभुषण फाऊंडेशन
निमगावजाळी, ता. संगमनेर जि. अ.नगर

खरी प्रतीलिपी
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहमदनगर विभाग अहमदनगर

नक्कल तयार करणार-
ताडून पहाणार
रुजवात घेणार ------

सहाय्यक धर्मादाय आयुक्त अहमदनगर विभाग, अहमदनगर